

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

## संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम



वर्ष पहिले । अंक दुसरा । जुलै – सप्टेंबर २०१९

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...
संगमेश्वर कॉलेज,सोलापूर



प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती** –
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई–मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## संपादकीय ...

पहिल्या ई-मासिकाच्या प्रकाशनानंतर दुसऱ्या अंकात महाविद्यालयातील घडणाऱ्या घडामोडींचा आढावा घेतला आहे. जून महिना म्हटलं की शाळा महाविद्यालयांची सुरुवात आणि पालकांची गर्दी याच्या देखील नोंदी या अंकामध्ये करण्यात आल्या आहेत. साहित्य हे समाज मनाच्या जाणिवा समृद्ध करते असे प्रतिपादन आनंद देशपांडे यांनी केले.डॉ.गुरुराज करजगी यांचे शिक्षकांसाठी व्याख्यान झाले. त्यात त्यांनी शिक्षकांनी आजन्म विद्यार्थी राहून अध्यापन करावे, असे सांगत बहुमोल उद्बोधन केले. यूजीसीच्या स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राममध्ये डॉ.आय. आय.मुजावर यांनी बौद्धिक कौशल्याला तंत्राची जोड द्यावी असे सांगितले. राष्ट्रीय भाषा शिक्षक संघ आयोजित कार्यक्रमात प्राध्यापक पी. एन. रमणी यांनी मार्गदर्शन केले. मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटनात कवी इंद्रजित घुले यांनी कवितेवर भाष्य केले. प्राध्यापक अशोक मुलीमनी यांनी भाषिक कौशल्य महत्त्वाचे आहेत, हे सांगत जागतिकीकरण अधोरेखित केलं.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांचा उत्कृष्ट महाविद्यालयाचा २०१९ चा पुरस्कार एक ऑगस्ट रोजी महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला. ही अभिमानाची गोष्ट आहे. राज्य शासन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'पुलं' देशपांडे स्टँड अप कॉमेडी स्पर्धा २०१९ - २० संपन्न झाली. कॉलेजचा जैद शेख या स्पर्धेत विजेता ठरला.एन.सी.सी.च्यावतीने कारगिल युद्ध दिन साजरा झाला.

ऑलम्पिक दिनानिमित्त ऑलम्पिक दौड , कनिष्ठ विभागासाठी वाणिज्य शाखेतील संधी ,आंतरराष्ट्रीय योग दिन यांचे वृत्तांत , तसेच स्पर्धा परीक्षांचा निकाल शिक्षक दिन वृत्तांत वाचनीय आहेत. आमच्या संस्थेचे प्रेरणास्थान कर्मयोगी कै.आप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान आणि विविध उपक्रमांची उपक्रमांची माहिती आपणास या अंकातून होईल. सीए. सीएस. सीएमए. मधील संधी या विषयावर विद्यार्थीकेंद्रीय व्याख्यान झाले. यंदाच्या वर्षात प्रज्ञा या कॉलेजचा वार्षिकांकाने विद्यापीठाच्या वार्षिकांक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. या घडामोडींसह हा अंक आपल्या पर्यंत पोहचवत आहोत. वाचक नक्कीच या नियतकालिकाचे स्वागत करतील आणि आपल्या सूचनाही आमच्यापर्यंत पोहोचवतील.




# साहित्य हे समाज मनाच्या जाणिवा समृद्ध करतं ' –आनंद देशपांडे

## संगमेश्वर कॉलेजात मराठी विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन

सोलपूर (दिनांक ३ )"ज्या समाजात श्रेष्ठ साहित्य जन्माला येते, प्रेरक इतिहास निर्माण होतो, तो समाज अधिकाधिक सक्षम, सुसंस्कृत आणि विकसनशील बनत जातो. त्यामुळे संस्कृतीच्या विकासात साहित्य आणि इतिहासाचे स्थान महत्त्वाचे ठरते."असे मत चित्रपट कलावंत, इतिहासाचे अभ्यासक, व लेखक विधिज्ञ आनंद देशपांडे यांनी मांडले.

संगमेश्वर कॉलेजातील मराठी विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'साहित्य इतिहास आणि संस्कृती' या विषयावरील व्याख्यानात देशपांडे बोलत होते. "विद्यार्थ्यांनी श्रेष्ठ आणि ऐतिहासिक साहित्य वाचले पाहिजे, गडकिल्ले जाणतेपणाने पाहिले पाहिजेत. जीवनात मिळालेली संधी वाया न दवडता प्रत्येक संधीचे सोने करण्याची तयारी ठेवली पाहिजे, अशी तयारी असली की जीवन आपोआप यशस्वी होते, आपल्या हातून काही उत्तम घडते, त्यासाठी अभ्यासूवृत्तीने विद्यार्थ्यांनी जीवनाकडे, आपल्या प्रदेशाकडे, इतिहासाकडे साहित्याकडे पाहायला शिकले पाहिजे.मराठी भाषेच्या समृद्धीचा त्यांनी लाभ उठवला पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.

"नाट्य आणि चित्रपट क्षेत्रात मला ज्या संधी होत्या त्या संधी मी स्वीकारल्या आणि मिळालेल्या भूमिका मनस्वी पणाने जगत राहिलो ,करत राहिलो, त्यामुळे नाट्य आणि चित्रपट क्षेत्रात थोडेफार कार्य माझ्याकडून घडले. कलावंत विद्यार्थ्यांनी शिकण्याची वृत्ती आणि परिश्रम करण्याची तयारी ठेवली तर यश त्यांच्यापासून फार दूर नसते एवढे लक्षात ठेवावे." असे देशपांडे यावेळी म्हणाले.

समारंभाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर मराठी विभाग प्रमुख डॉ सुहास पुजारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत विभागाची भूमिका मांडली आणि पाहुण्यांचा परिचय करून दिला तर प्राचार्यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य या होत्या. कन्नड विभागाचे सेवानिवृत्त प्रमुख डॉ बी.बी. पुजारी,

डॉ महादेव देशमुख, सारीपुत्र तूपेरे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या समारंभाचे सूत्रसंचालन अतुल राठोड आणि प्रभुदास भंडारे यांनी केले. समारंभास ल.भा. पा.महिला महाविद्यालयाचे डॉ विजय रेवजे आणि आणि त्यांच्यासमवेत या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीही या समारंभास आवर्जून उपस्थित होत्या.

# शिक्षकांनी आजन्म विद्यार्थी राहून अध्यापन करावं

### डॉ. गुरुराज करजगी



## संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये अध्यापकांसाठी व्याख्यान

सोलापूर (दिनांक ८ जुलै) शिक्षकांनी आजन्म विद्यार्थी राहून आनंदी मनाने अध्यापन करावं त्यातून देश सक्षम होईल. देशाच्या सक्षमीकरणासाठी शिक्षकचं व्यक्तिमत्व विकासाची संस्कारमुल्ये रुजवू शकतात. विद्यार्थी शिक्षकांचं अनुकरण करतात यासाठी शिक्षकांनी आपल्या आचरणातून आदर्श निर्माण करावेत" असे प्रतिपादन अकॅडमिक ॲक्ट बंगळुरूचे चेअरमन डॉक्टर गुरुराज करजगीकर यांनी केलं. ते संगमेश्वर पब्लिक स्कूल सोलापूर येथे आयोजित शिक्षकांसाठीच्या व्याख्यानात बोलत होते.अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी हे होते.तर सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे डॉक्टर राजशेखर येळीकर, मल्लिकार्जुन कळके, भीमाशंकर पाटणे, प्रा. सी.बी. नाडगौडा आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झालं. संस्थेच्या वतीने डॉक्टर करजगीकर यांचा सत्कार करण्यात आला ते पुढे म्हणाले की ," शिक्षण क्षेत्रात अध्यापन करताना शिक्षणाची अभिरुची अधिक महत्त्वाचे असते, ती अभिरुची फक्त शिक्षकच निर्माण करू शकतात. शिक्षणाविषयीची आवड आस्था, देशाप्रती त्याग भावना निर्माण करणारा हाच खरा हाडाचा शिक्षक असतो असंही त्यांनी सांगितलं .विषयाची सहज सुंदर उकल करत आवड निर्माण करणारा, संस्कारांची मुल्ये रुजवणारा आणि विद्यार्थी- शिक्षक- पालक यात आपुलकीचं नाते निर्माण करणारा अध्यापक राष्ट्रउभारणीत मोलाचे योगदान देउ शकतो. " आपल्या दिलखुलास संवादात व्रतस्थपणे काम करत असताना समाजभान ठेवत नीतिमूल्यांची रुजवणूक आपण कशी केली पाहिजे यासंबंधी अनेक कथा, प्रात्यक्षिकांच्या द्वारे डॉक्टर गुरुराज करजगी यांनी दृक-श्राव्य माध्यमातून उद्बोधन केलं.

याप्रसंगी व्यवस्थापन समिती सदस्य शरणराज काडादी, प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य डी.एम.मेत्री, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी, प्राचार्य संतोष पाटील, डॉ.दिपाली करजगीकर यांच्यासह संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी आणि श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलातील शिक्षक-प्राध्यापक मंडळी उपस्थित होती.



# बौद्धिक कौशल्याला भावनिक व्यक्तिमत्त्वाची जोड हवी. – डॉ. आय. आय. मुजावर

## संगमेश्वर मध्ये युजीसी चा ' स्टुडंट इंडक्शन प्रोग्राम ' संपन्न




सोलापूर : ( प्रतिनिधी )
विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्याचा बौद्धिक विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे. त्यासाठी विविध कौशल्ये त्याला शिकविली जातात. नव्या शैक्षणिक धोरणात यावर भर दिलेला आहे. हे जरी खरे असले तरी विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास जसा महत्त्वाचा आहे तसाच त्यांचा भावनिक विकास होणे गरजेचे आहे. कारण यातून विद्यार्थ्यांकडून चांगले कार्य होते. म्हणूनच कॉलेज स्तरावर विद्यार्थ्यांचे भावनिक व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. असे विचार ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. आय. आय. मुजावर यांनी मांडले.

संगमेश्वर का ॅलेज मधील नॅक विभागाच्या वतीने बी. ए., बी. का ॅम., बी. एस्सी. भाग एक च्या विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय युजीसी पुरस्कृत विद्यार्थी प्रेरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उदघाटन डॉ. मुजावर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सौ. शोभा राजमान्य या होत्या. डॉ. मुजावर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आयुष्य ही एक सुवर्ण संधी आहे. त्याचा उपयोग योग्य पध्दतीने करणे आवश्यक आहे. शिक्षणामध्ये एकमेकांना समजून घेणे गरजेचे असते. त्यातूनच आपला बौद्धिक विकास होतो. पण केवळ बौद्धिक क्षमतेमुळे यश मिळत नाही तर त्यासाठी भावनिक विकासही महत्त्वाचा आहे. प्रत्येकाने स्वतःला समजून घेऊन आपल्या विचारांना योग्य वळण द्यायला हवे. जीवनाकडे बघण्याची दृष्टी बदलल्यास त्याबरोबर आपला दृष्टिकोनही बदलतो. असे विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजमान्य यांनी विद्यार्थ्यांमुळेच का ॅलेजला नावलौकिक मिळत असतो. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्यातील कलागुणांना वाव द्यायला हवा. जबाबदारीची जाणीव ठेवून काम करायला हवे. या प्रेरक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडण्यास निश्चित मदत होईल असे विचार मांडले.
दुसऱ्या सत्रात उपप्राचार्य डी. एम. मेत्री यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाविषयी मार्गदर्शन केले. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था, स्वायत्त महाविद्यालये, त्यातील नव्या संधी याविषयी माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. सौ. एन. व्ही. साठे यांनी का ॅलेजमधील विविध विद्यार्थीकेंद्री उपक्रमांची ओळख करून दिली. का ॅलेजमध्ये चालणारे वेगवेगळे कोर्सेस, राष्ट्रीय सेवा योजना, छात्र सेना, अभ्यास मंडळे, पदव्युत्तर वर्ग, शिष्यवृत्ती इ. घटकांची तपशीलवार माहिती दिली. चौथ्या सत्रात ग्रंथपाल डॉ. व्ही . एन. मुलीमनी व सहाय्यक ग्रंथपाल एस. पी. कुलकर्णी यांनी ग्रंथालयीन प्रक्रिया, विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा. त्यासाठी आवश्यक असणारे ग्रंथालयातील साधणांची माहिती पीपीटीच्या माध्यमातून करून दिली. यावेळी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी चित्रफिती दाखविण्यात आल्या. त्यावर आधारित विचारमंथन करण्यात आले.

कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. सौ. ए. व्ही. दिवटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सारीपुत्र तुपेरे यांनी केले तर आभार डॉ. शीला रामपुरे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कृती संशोधनातुन इंग्रजी शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होते
# - प्रा. पी. एन. रमणी

## संगमेश्वरमध्ये राष्ट्रीय भाषा शिक्षक संघाकडून उदबोधन वर्ग

सोलापूर (प्रतिनिधी)

"बदलत्या तंत्रानुसार शिक्षण क्षेत्रात अनेक अध्यापन पद्धती विकसित होत आहेत. मात्र कृती संशोधनातुन इंग्रजी विषय शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होते. शिक्षकांचे गुणवत्तापूर्ण अध्ययन -अध्यापन होऊन भाषेची गोडी लागावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि ही काळाची गरज आहे." असे प्रतिपादन प्राध्यापक रमणी यांनी केलं. ते संगमेश्वर कॉलेजमध्ये आयोजित इंग्रजी भाषा शिक्षकांसाठीच्या राष्ट्रीय उद्बोधन वर्गात बोलत होते. इंग्लिश लैंग्वेज टीचर्स असोसिएशन ऑफ इंडिया ( एल.टाय ) प्रायोजित सोलापूर शाखा आणि संगमेश्वर कॉलेज इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करारातून राष्ट्रीय उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या या उद्बोधन वर्गाच्या उद्घाटन सत्रात तिरुपती येथील राष्ट्रीय उपाध्यक्ष प्राध्यापक रेड्डी शेखर रेड्डी, सोलापूरच्या समन्वयक डॉ. उषा जमादार, शाखेचे अध्यक्ष सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रा,डॉ,ऑनी जॉन , उपाध्यक्ष प्रा. मनोहर जोशी , सचिव प्राध्यापक धानप्पा मैत्री आदींची मंचावर उपस्थिती होती.

एकूण चार सत्रातील उद्बोधन वर्गात प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन अध्यापकांना मार्गदर्शन करण्यात आले. इंग्रजी भाषा शिक्षणातील वैविध्यपूर्ण उपक्रम शिक्षकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अध्यापनासाठी विचारमंथन झाले . प्राध्यापक रमणी पुढे म्हणाले की , "आज संगणक आणि रोबोटच्या काळात वर्ग अध्यापनाचे महत्त्व कमी झाले नाही. म्हणून विद्यार्थीकेंद्री अध्यापन शिक्षकांकडून होताना नवतंत्रज्ञानाचा ही वापर मोठ्या खुबीने केला की आनंददायी शिक्षण होण्यास मदत होईल, असा विश्वास वाटतो." या राष्ट्रीय उद्बोधन वर्गात सोलापूरसह महाराष्ट्र, तेलंगण आणि कर्नाटकातील 180 हून अधिक शिक्षकांनी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन प्रा. कोमल कोंडा यांनी केले तरआभार प्रा.नागेश खराडे यांनी मानले.




## जगण्याची संवेदना मांडणारी विवेकवादी कविता लिहावी

**– कवी इंद्रजित घुले**

# संगमेश्वरमध्ये मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

सोलापूर ( प्रतिनिधी )
भाषा आणि साहित्य हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. साहित्यातून मानवी अंतरीचा दिवा प्रकाशमान होतो. कविता ही त्या दिव्यातील ज्योतआहे. जीवनातील संवेदना त्यातून प्रभावीपणे आविष्कृत होतात. अवास्तवता, कल्पनारंजकता यापेक्षा वास्तव्य जीवन दर्शन घडवणारी कविताच श्रेष्ठ ठरते. त्यामुळे नवोदित कवींनी जगण्यातील संवेदना विवेकवादी भूमिकेतून मांडाव्यात असे विचार मंगळवेढ्याचे कवी इंद्रजित घुले यांनी मांडले.
संगमेश्वर कॉलेज मधील मराठी विभागाच्या वतीने मराठी वांग्मय मंडळाचे उद्घाटन कवी घुले यांच्या हस्ते झालं . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य यांनी भूषवले. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉक्टर सुहास पुजारी , समन्वयक डॉक्टर महादेव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.घुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भाषा आणि साहित्य यांचे मानवी जीवनातील महत्त्व सांगितले.प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आपल्या मातृभाषेचा अभिमान असायला हवा. त्याने साहित्याचे वाचन करायला हवे. साहित्य माणसाला दृष्टी देते त्यातून सृष्टीचे आकलन होते.जीवनवादी साहित्य जगण्यातील अस्वस्थता मांडत असते कविताही या जगण्यावर भाष्य करते बुद्धीला सत्याकडे आणि भावनेला माणुसकी कडे घेऊन जाते त्यामुळे तरुणांनी कवितेला गांभीर्यानं समजून घ्यावे असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी आपल्या कवितांच सादरीकरण केलं. लग्नातलं जेवण या कवितेला विद्यार्थ्यांनी विशेष दाद दिली. अध्यक्ष मनोगतत् प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य यांनी वाचनाबरोबरच लेखनाचे महत्त्व विशद केलं. अलीकडे विद्यार्थ्यांचे लेखन चुकीच असल्याचं दिसतं. त्यामुळे प्रमाण मराठी लेखनाच्या नियमानुसारच लेखन करावे. असं आवाहन त्यांनी केलं. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी वाङ्मय मंडळाचे समन्वयक डॉक्टर महादेव देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन आणि पाहुण्यांचा परिचय डॉक्टर सारीपुत्र तुपेरे यांनी करून दिला. आभार गुरुशांतव्वा गौडगाव यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# बदलत्या तंत्रा बरोबर भाषिक कौशल्य आत्मसात करा. प्रा. अशोक मुलीमनी

## संगमेश्वरमध्ये भाषिक स्पर्धांचे बक्षीस वितरण

सोलापूर दिनांक २ ऑगस्ट
"जागतिकीकरणाच्या रेट्यात यांत्रिकीकरण होत आहे. याबद्दल त्या तंत्राबरोबर भाषिक कौशल्य आत्मसात करा. त्यातून आपले सर्वांगीण व्यक्तिमत्व घडते. परदेशी जेव्हा तुम्ही करता तेव्हा डिजिटल मीडिया लक्षात ठेवा, कारण त्याचा वापर नोकरी मिळवण्यासाठी अनेक क्षेत्रात स्पर्धा आहे. लोकल ते ग्लोबल असा विचार आणि वावर वाढतो. म्हणून प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक जाहिराती देखील आपल्याला खूप काही शिकवतात. डिजिटल मार्केटिंग मधून अनेक नोकऱ्या उपल आहेत. त्यातली कौशल्ये आत्मसात करा ." असे प्रतिपादन अशोक मुलीमनी यांनी केलं. ते संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजच्या भाषिक स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते. मंचावर उपप्राचार्य आनंद हुली पर्यवेक्षक प्रा. प्रसाद कुंटे, भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील आदी उपस्थित होते. प्रारंभी ग्रंथपूजन मान्यवर आणि विद्यार्थ्यंच्या हस्ते झाले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अनिता अलकुंटे यांनी करून दिला. कॉलेजच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्रा. प्रसाद कुंटे यांनी केला. सत्कारानंतर मुलीमनी यांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला.
ते पुढे म्हणाले की, " तंत्र शिक्षणासाठी पालकांनी पुढाकार घेतला तर विद्यार्थ्यांनी भाषेला शालेय जीवनापासूनच महत्त्व दिले पाहिजे. त्याची स्थित्यंतरे ओळखली पाहिजेत. काळ काम आणि वेग याचे उत्तम नियोजन करा. मुंबई-पुण्यातील विद्यार्थी वेळेचे बंधन पाळून वेगाबरोबर धावतात त्याची जाणीवही आपण ठेवली पाहिजे. प्रथम प्राधान्य कामाला द्या . कर्माचे फळ नेहमी आनंददायी असतं. कष्टातून जीवनातील वेगवेगळ्या संकटांना आपण सामोरे जात असतो त्यातूनच अनेक अनुभव आपल्या पाठीशी तयार होतात. अनेक बरे वाईट अनुभव तुम्हाला समृद्ध करत राहतील. शब्दकोडे आणि जाहिरातींच्या माध्यमातून आपले शब्दभांडार वाढते. खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू कॉलेजच्या अशा बौद्धिक खेळाच्या माध्यमातून व विविध उपक्रमातून घडतात. संगणक क्षेत्रात वेगवेगळ्या कंपन्यात काम करण्यासाठी ग्लोबल सर्टिफिकेट्स हवेत. अत्याधुनिक ज्ञान मिळवण्यासाठी आपण ज्ञानार्थी बनले पाहिजे " असेही ते म्हणाले.त्यानंर बक्षीस वितरण झाले. चैतन्य विजापूर याने आपले मनोगत व्यक्त केलं, उपप्राचार्य आनंद हुलीयांनी अध्यक्षीय समारोप केला . याप्रसंगी प्रा. सायबण्णा निम्बर्गी, प्रा. मंजुळा बीड,प्रा. श्रीदेवी पाटील, प्रा. तानाजी घाडगे,प्रा. कोमल कोंडा, प्रा. डॉ. गणेश मुडेगावकर,प्रा. प्रदीप आर्य , प्रा. विश्वनाथ कक्कळमेली ,प्रा. दत्तात्रय गुडेवाडी, प्रा. संतोष पवार यांच्यासह पुरस्कार प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. गणेश मुडेगावकर यांनी स्पर्धेचं सादरीकरण दिल. प्रा. संतोष पवार यांनी सूत्रसंचालन केलं तर प्रा. तानाजी घाडगे यांनी आभार मानले .
सर्व छायाचित्रे - विद्यार्थी रोहन माने




## उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१९

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर च्या वतीने उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार 2019 साठी संगमेश्वर महाविद्यालयाची निवड झाली.

१ ऑगस्ट विद्यापीठाच्या वर्धापन दिनी हा पुरस्कार महाविद्यालयाला प्रदान केला गेला केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या कुलगुरू डॉक्टर मृणालिनी फडणवीस, सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर शोभा बनशेट्टी,सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष बापू देशमुख या मान्यवरांच्या शुभहस्ते. हा पुरस्कार कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य श्रीनिवास गोठे यांनी स्वीकारला. महाविद्यालयाच्या उज्ज्वल शैक्षणिक प्रवासात ज्या ज्ञात- अज्ञातांचा सहभाग आहे आणि राहील त्या सर्वांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने **मनःपूर्वक आभार.**

SHRI
S. E. SOCIETY
SOLAPUR

# 'पुलं' देशपांडे स्टँड-अप कॉमेडीमध्ये जैद शेख विजेता तर कुणाल बाबरे उपविजेता

## राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने संगमेश्वरमध्ये संपन्न झाली स्पर्धा




पु.ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्टॅन्ड- अप कॉमेडी स्पर्धा 2019-20 - हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे,सिनेनाट्य कलाकार बाळकृष्ण शिंदे , लेखक दिग्दर्शक राजीव मुळे (सातारा) शेखर कुलकर्णी (सांगली) सुनील खेडेकर (युनिट हेड, सोनी मराठी वाहिनी) डॉ. शोभा राजमान्य, समन्वयक डॉ.सुहास पुजारी, प्रा. संतोष पवार

सोलापूर (दिनांक ८)
महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने पु.ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्टॅन्ड- अप कॉमेडी स्पर्धा 2019-20 संगमेश्वर महाविद्यालयात संपन्न झाली. यामध्ये संगमेश्वर कॉलेजचा जैद अबुल हसन शेख इयत्ता अकरावी हा विजेता ठरला,तर श्री दिगंबर जैन गुरुकुलचा विद्यार्थी कुणाल अनिल बाबरे हा उपविजेता ठरला. विजेत्यांना परीक्षक हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे,सिनेनाट्य कलाकार बाळकृष्ण शिंदे , लेखक दिग्दर्शक राजीव मुळे (सातारा) शेखर कुलकर्णी (सांगली) सुनील खेडेकर (युनिट हेड, सोनी मराठी वाहिनी) डॉ. शोभा राजमान्य, समन्वयक डॉ.सुहास पुजारी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रथम पुरस्कार वीस हजार रुपये प्रशस्तीपत्र, द्वितीय पुरस्कार 15 हजार रुपये आणि प्रशस्तीपत्र असं पुरस्काराच स्वरूप होत. पुलंच्या साहित्यावर आधारित एकपात्री अभिनय स्पर्धा संगमेश्वर कॉलेजच्या डी १०६ सभागृहात झाली. महाराष्ट्रातील एकूण 36 केंद्रांवर ही स्पर्धा सध्या होत आहे. सोलापूर केंद्रातून शहर आणि जिल्ह्यातील सतरा स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला. उद्घाटनासाठी राज्य शासनाच्यावतीने दिपाली जपे या उपस्थित होत्या. मात्र केंद्रीय परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्या निधनामुळे त्यांना श्रद्धांजली अर्पण करून ही स्पर्धा दुसऱ्या दिवशी झाली. स्पर्धकांसाठी सहा अधिक दोन असा आठ मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. याप्रमाणे शहर आणि ग्रामीण भागातील कलाकारांनी हजेरी लावत या स्पर्धेत उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला .






यातील निवडक विजेत्यांना सोनी मराठी वाहीनीच्या पुलोत्सवाच्या कार्यक्रमात नामवंत कलाकारांबरोबर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे येत्या. 25 ऑगस्टला पुण्यात होणाऱ्या ' महाराष्ट्राची हास्य जत्रा ' या कार्यक्रमात महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यातील कलाकार सहभागी होतील. यात या विजेत्यांचा देखील सहभाग असणार आहे.

दीपप्रज्वलन करून स्पर्धेप्रारंभ करण्यात आला. त्यानंतचा शाळा-महाविद्यालयातील आणि खुल्या गटातील विद्यार्थी आणि स्पर्धकांनी उस्फूर्तपणे या स्टँड अप कॉमेडी मध्ये पुलंच्या साहित्यावरील सादरीकरण केलं .दुपारच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात परीक्षकांच्या वतीने सिने नाट्य कलाकार बाळकृष्ण शिंदे यांनी आपल्या मनोगतात स्पर्धकांना उपयुक्त टिप्स देत संवाद साधला. त्यानंतर हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे यांनी स्टैंड अप कॉमेडी आणि पुलंचं साहित्य यावर प्रकाश टाकत स्पर्धकांना बहुमोल मार्गदर्शन केले.डॉ. सुहास पुजारी यांनी कॉलेजच्या वतीने स्पर्धा समन्वयक या नात्याने आयोजना मागचा हेतू स्पष्ट करून कॉलेजच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. प्रा. संतोष पवार यांनी या संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन करून आभार मानले . डॉ. गणेश मुडेगावकर प्रा.दत्तात्रय गुडेवाडी डॉ.शिल्पा रामपुरे, डॉ. संघ प्रकाश दुद्दे, डॉ. दादासाहेब खांडेकर आदींनी सहकार्य केलं . याप्रसंगी विद्यार्थी ,मार्गदर्शक आणि शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना वाणिज्य विभागातून सीएमएच्या भरपूर संधी
## – एन. डी. दोंतुल
## संगमेश्वरमध्ये वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान

सोलापूर ( दिनांक 29 )
'वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना कॉस्ट मॅनेजमेंट अकाऊंट या क्षेत्रात भरपूर संधी आहेत त्याचा लाभ घेण्यासाठी अकरावीपासूनच आपण तयारी करावी. जिद्द, चिकाटी, योग्य मार्गदर्शनाने आपण या क्षेत्रात स्थिर होऊ शकतो.' असे प्रतिपादन द इन्स्टिट्यूट ऑफ कास्ट अकाउंट ऑफ इंडियाचे समन्वयक एन. डी. दोंतुल यांनी केलं ते संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.



याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रभाकर नागणसुरे अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. प्राध्यापक मल्लिनाथ साखरे यांनी प्रास्ताविक केलं. त्यानंतर सीएमए क्षेत्रातील वेगवेगळ्या संधीबाबत एन. डी. दोंतुल आणि आर. व्ही. क्षीरसागर यांनी चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, 'भारतातील उद्योग क्षेत्रात वेगवेगळ्या कंपन्यांमधून कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाऊंट विभागात काम करण्याची संधी अनेक ठिकाणी आहे. कंपनी सेक्रेटरी पासून टॅक्स कन्सल्टन्सी पर्यंत वेगवेगळ्या कोर्स च्या माध्यमातून विद्यार्थी उच्चपदस्थ नोकऱ्या मिळू शकतात. याची सोलापुरात अनेक उदाहरण आहेत.' वेगवेगळ्या उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी वाणिज्य शाखेतील प्रा. बी. आय. हंमागाव , प्राध्यापिका अनिता अलकुंटे ,प्रा.सगर, प्रा. बिराजदार, प्रा. संतोष पवार यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्राध्यापिका संगीता म्हमाणे यांनी सूत्रसंचालन केले तर प्राध्यापिका रूपाली पाटील यांनी आभार मानले.

# संगमेश्वर मध्ये कारगील विजय दिन साजरा

## एनसीसी 9 महाराष्ट्र बटालियन च्या वतीने अभिवादन

सोलापूर – दिनांक 25 जुलै

26 जुलै हा कारगिल युद्ध विजय दिवस संगमेश्वर कॉलेजमध्ये ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यांच्यावतीने साजरा करण्यात आला . या प्रसंगी लेफ्टनंट कर्नल विकास पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलं होतं. प्रत्यक्ष युद्धभूमीवर युद्धात सहभागी झालेल्या लेफ्टनंट कर्नल विकास पवार यांनी विद्यार्थ्यांसमोर कारगिल युद्धातील प्रसंग कथन केले. या युद्धाची कारणे, प्रतिकूल परिस्थितीत भारतीय सैन्यदलाने मिळवलेल्या विजयासंबंधी बोलताना पवार यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सैन्यदलाच्या बलिदानाची गोष्ट भारलेल्या वातावरणात सांगितली आणि विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान जागृत केला.

या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की , " वीस वर्षांपूर्वी युद्धाची पार्श्वभूमी नसताना 1971च्या युद्धाची सल आणि 1998 चा अणुस्फोट , 1984 ऑपरेशन मेघदूत या साऱ्या कारणांमुळे ही युद्धाची पार्श्वभूमी तयार झाली. वास्तविक अनेक छुप्या मार्गाने शत्रू भारताला सतत त्रास देत होता, या हल्ल्याची जबाबदारी सुरुवातीला शत्रूंना घेतली नाही. त्यानंतर मात्र आपल्या सैन्याने प्राणाची बाजी लावत जोरदार मुसंडी मारली आणि कारगिलमधील 132 ठाणी भारताच्या ताब्यात आणली, तिथे तिरंगा फडकवून हे युद्ध जिंकलं."




**26 जुलै हा कारगिल युद्ध विजय दिवस संगमेश्वर कॉलेजमध्ये ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यांच्यावतीने साजरा करण्यात आला . या प्रसंगी लेफ्टनंट कर्नल विकास पवार यांनी संवाद साधला**




या युद्धातील अनेक रोमहर्षक प्रसंग, कठीण परिस्थितीचा सामना करताना भारतीय लष्कराचे सामर्थ्य , तांत्रिक बाजू , बेडरपणा लेफ्टनंट कर्नल विकास पवार यांनी एनसीसीच्या विद्यार्थ्यांसमोर ठेवले. यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. प्रारंभी शहीद जवानांना एनसीसी ९ महाराष्ट्र बटालियनच्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर पवार यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाची सांगता एनसीसी गीताने झाली.
या प्रसंगी मेजर चंद्रकांत हिरतोट, लेफ्ट. शिल्पा लब्बा , कर्नल प्रमोदकुमार रावत, मेजर जीतबहादूर गुरुंग,सुभेदार गजानन गुरव ,सुभेदार रवींद्र पाटील , बी एस एफ – बाबू शिंदे , हवालदार एफ. एस. पाटील प्रा.संतोष पवार यांच्यासह संगमेश्वर कॉलेज च्या 9 महाराष्ट्र बटालियन कॅडेटच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिनानिमित्त
## संगमेश्वर मध्ये दौडचे आयोजन




सोलापूर (दिनांक 23) आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिनानिमित्त संगमेश्वर शिक्षण संकुलाच्या वतीने दौडचे आयोजन केले होते. संगमेश्वर कॉलेज वरिष्ठ विभाग, जुनियर विभाग आणि संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील विद्यार्थी,प्राध्यापक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांचा यामध्ये समावेश होता. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयातील क्रीडाधिकारी नदीम शेख आणि कॉलेजच्या प्राचार्या डॉक्टर शोभा राजमान्य यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला आणि ऑलिंपिक दौडला सुरुवात झाली. सात रस्ता, रेल्वे लाईन, सिटी प्राईड मार्गे जुना एम्प्लॉयमेंट चौक मार्गे विद्यार्थी प्राध्यापक या दौडमध्ये धावले.
यामध्ये वरिष्ठ कॉलेजचे सर्व विभागाचे उपप्राचार्य, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य आनंद हुली, सर्व विभाग प्रमुख, पब्लिक स्कूल मधील विद्यार्थी- शिक्षक, प्रशांत बिराजदार, वादीराज कुलकर्णी शारीरिक शिक्षण विभागातील खेळाडू आणि प्राध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती . शारीरिक शिक्षण संचालक प्राध्यापक आनंद चव्हाण, प्रा. शरण वांगी, विक्रांत विभुते आणि संगमेश्वर कॉलेजच्या धावपटूंनी नियोजन केले. पोलीस निरीक्षक ऋषिकेश पडवळ यांच्यासह वाहतूक शाखेच्या पोलिसांनी नियोजनबद्ध सहकार्य केलं तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून प्रा. संतोष खेंडे यांनी आभार मानले .



**भल्या सकाळी आपापल्या** विभागाचा गणवेश परिधान करून, सतरंजी, पाण्याची बाटली हातामध्ये घेऊन मैदानावर जमलेले विद्यार्थी... प्राध्यापक एनसीसी. आरएसपी. चे पथक आणि सोबत शाळांचे विद्यार्थी मान्यवरांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असलेले जिमखाना विभागाचे योगशिक्षक... योग प्रशिक्षक यांचे कर्णमधुर हिंदीतून निवेदन.... प्रधानमंत्र्यांचे दूरदर्शन –आकाशवाणीवरील भाषण... ओमकाराचा मंद निनाद ... अश्या भारलेल्या उत्साही वातावरणात...शहरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये २१ जून हा पाचवा आंतरराष्ट्रीय योग दिन शहरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध शाळांसह संस्थांनी योग दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते.संगमेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



# आंतरराष्ट्रीय योगदिन संगमेश्वर कॉलेजमध्ये उत्साहात साजरा

सोलापूर (दिनांक २१ जून) भल्या सकाळी आपापल्या विभागाचा गणवेश परिधान करून, सतरंजी, पाण्याची बाटली हातामध्ये घेऊन मैदानावर जमलेले विद्यार्थी... प्राध्यापक एनसीसी. आरएसपी. चे पथक आणि सोबत शाळांचे विद्यार्थी मान्यवरांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असलेले जिमखाना विभागाचे योगशिक्षक... योग प्रशिक्षक यांचे कर्णमधुर हिंदीतून निवेदन.... प्रधानमंत्र्यांचे दूरदर्शन –आकाशवाणीवरील भाषण... ओमकाराचा मंद निनाद ... अश्या भारलेल्या उत्साही वातावरणात...शहरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये २१ जून हा पाचवा आंतरराष्ट्रीय योग दिन शहरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध शाळांसह संस्थांनी योग दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते.संगमेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

विवेकानंद केंद्र सोलापूरचे कार्यकर्ते तथा संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक,योग प्रशिक्षक शिवराज पाटील यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून योग वर्ग घेतला.प्रात्यक्षिक शारीरिक शिक्षण संचालक प्राध्यापक आनंद चव्हाण यांनी केले. प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रम विभुते, प्रा. शिल्पा लब्बा आदींनी विद्यार्थ्यांचे नियोजन केले.या कार्यक्रमासाठी संगमेश्वर कॉलेजचे सर्व प्राध्यापक मंडळी, ९ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, आरएसपी बटालियन, शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली यांच्यासह सर्व विभागाचे उपप्राचार्य, विभाग प्रमुख ,कार्यालयीन कर्मचारी आदींनी या योग वर्गाचा लाभ घेतला. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. जवळपास पाच हजार वर्षांहून अधिक मोठी परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्या महत्त्वाची असून राज्यभरातून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा झाला .भारतातील अनेक राज्यांत पहाटेपासूनच योग शिबिरांना सुरुवात झाली. आबालवृद्ध यात सहभागी झाले . योगविषयक जागृती करण्यासाठी अनेक ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः झारखंडची राजधानी रांची इथं हजारो लोकांसोबत आसनं केली.



# जेईई ॲडव्हान्स परीक्षेत संगमेश्वरचे विश्वनाथ पवार, अथर्व गोखले, मुद्दय्या स्वामी आयआयटीसाठी पात्र

सोलापूर (दिनांक 14) आयआयटी रूरकी यांच्या वतीने घेण्यात आलेल्या भारतातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थेसाठीच्या अर्थात आयआयटी ॲडव्हान्स परीक्षेत संगमेश्वरच्या विश्वनाथ पवार, अथर्व गोखले, मुदया स्वामी यांनी घवघवीत यश मिळवले. यात विश्वनाथ पवार याने ईडब्ल्यूएस या विभागात भारतातून 654 वा आला तर अथर्व गोखले 9 हजार 56 वा आला आणि मुदय्या स्वामी हा ओबीसी प्रवर्गातून 6 हजार 573 व्या क्रमांकावर राहिला.

या तिघांना अनुक्रमे एकूण 272 गुणांपैकी (पवार 144 ,गोखले 131, स्वामी 88) एवढ्या गुणानुक्रमांकासह संगमेश्वरचे हे विद्यार्थी सोलापुरातून जेईई ॲडव्हान्स परीक्षेमध्ये अव्वल राहिले. या घवघवीत यशाबद्दल कॉलेजच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. आयआयटी भारतातील सर्वोच्च अभियांत्रिकी संस्थेच्या प्रवेश परीक्षेसाठी एक लाख 61 हजार 319 विद्यार्थी बसले होते. यापैकी 38 हजार सातशे पाच विद्यार्थी या परीक्षेस पात्र झाले. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने सचिव मा.धर्मराज काडादी प्राचार्य शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य एस. जे. आवटे, सीईटी सेल प्रमुख डॉ. गणेश मुडेगावकर लॉजिकचे प्रा.सुशांत माळवे आदींनी अभिनंदन केले. आणि त्यांच्या पुढच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी प्रा. संतोष पवार यांच्यासह पालक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**अथर्व गोखले 9 हजार 56वा आला तर विश्वनाथ पवार  ईडब्ल्यूएस या विभागात भारतातून 654 वा आला आणि मुदय्या स्वामी हा ओबीसी प्रवर्गातून 6 हजार 573 व्या क्रमांकावर राहिला.**

# संगमेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अधिक दोन स्तरचे उद्घाटन

सोलापूर (प्रतिनिधी)

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे देशात सेवेचा संस्कार करणारी देशाभिमानाचे भावना वृद्धिंगत करणारे प्रक्रिया आहे. असे प्रतिपादन पाखर संकुल संस्थेच्या प्रमुख शुभांगी बुवा यांनी केलं. संगमेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अधिक दोन स्तरच्या उद्घाटन प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. त्या ते पुढे म्हणाल्या , की समाजातील अनाथ ,निराधार, वृद्ध, अपंग यांच्याबद्दलची जाणीवजागृती निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना यासारख्या उपक्रमातून निर्माण होत असते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य आनंद हुली हे होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक हर्षवर्धन पाटील यांनी केलं. पाहुण्यांचा परिचय कुमारी हेमांगी कोलते यांनी करून दिला. तर आभार ऋषिकेश कुलकर्णी यांनी मानले. सूत्रसंचालन रघुनंदन गायकवाड यांनी केलं. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवकांची महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती ..




राष्ट्रीय सेवा योजना अधिक दोन स्तरच्या उद्घाटन प्रसंगी पाखर संकुल संस्थेच्या प्रमुख शुभांगी बुवा,उपप्राचार्य आनंद हुली,कार्यक्रम अधिकारी प्रा.हर्षवर्धन पाटील, प्रा. विश्वनाथ कक्कळमेली,प्रा. शिवराज देसाई इतर मान्यवर

# एमएच-सीईटीत संगमेश्वर कॉलेजचा मुदय्या स्वामी ओबीसीतून महाराष्ट्रात अव्वल...

सोलापूर(दिनांक)
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमामध्ये प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेचा (एमएचटी-सीईटी) निकाल मंगळवारी ४ जूनला आनलाईन जाहीर करण्यात आला. या परीक्षेत संगमेश्वर कॉलेज सोलापूरचा मुद्य्या धोंडय्या स्वामी याने 99.9 पर्सेंटाइल गुण घेऊन महाराष्ट्रात ओबीसीप्रवर्गातून अव्वल आला . यापूर्वी विजय जगदीश मुंदडा या संगमेश्वर कॉलेजच्याच विद्यार्थ्यांने २०० पैकी १९७ गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला होता.
अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र आणि कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या एमएच-सीईटी परीक्षेचा निकाल
कालhttps://mhtcet2019.mahaonline.gov.in/
या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहायला मिळाला.
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने राज्यभरातील ३६ जिल्ह्याच्या ठिकाणी १६६ परीक्षा केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने १० दिवस १९ सत्रांत ही परीक्षा झाली होती. या परीक्षेसाठी ४ लाख १३ हजार २८४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३ लाख ९२ हजार ३५४ विद्यार्थी परीक्षेला बसले.पीएसएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) हे विषय घेऊन २ लाख ७६ हजार १६६ विद्यार्थी बसले होते, तर पीसीबी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) हे विषय घेऊन २८ हजार १५४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते.
महाविद्यालयाच्या एकूण सत्तावीस विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये आपली यशस्वी ओळख निर्माण केली आहे.
99.00 पेक्षा जास्त गुण घेणारे आठ विद्यार्थी संगमेश्वर महाविद्यालयाचे आहेत तर 97.00 पर्सेंटाइल पेक्षा जास्त गुण घेणारे 13 विद्यार्थी संगमेश्वर कॉलेज चे आहेत. पीसीएम (PCM)ग्रुपमधून 99.99% गुण घेऊन मुदय्या धोंडय्या स्वामी महाराष्ट्रात अव्वल ठरला तर पीसीबी ग्रुप मधून तेजश्री संजय तोडकरी 99.140 गुण घेऊन सोलापूरमधून सर्वप्रथम आली.

**संगमेश्वरचे यशस्वी विद्यार्थी:**
मुदय्या स्वामी 99.9
रिद्धी थरेवाल 99.90
श्रेया कोलकुर 99.8
तेजस्विनी करपे 99.81
विश्वनाथ पवार 99.80
अथर्व गोखले 99.56,
ओमकार गवळी 99.40,
अथर्व नावकर 98.89,
अनिकेत महाबोले 98.6,
ओंकार साले 98.19,
वैष्णवी डुरे 97.76,
ऋषिकेश कारंडे 97.6,
संकेत हौदे 96.93,
शुभांगी पाथेड 97.16,
सेजल बाळी 96.46,
हर्ष कापसे 95.62,
प्रांजली कुंटे 94.55,
सोम्या शेख 94.15,
परमेश्वर तलवार 93.70,
अनुप जुजगार 93.46,
प्रांजली राजमाने तर 93.25
कोमल लाछनकर 90.75.,
पीसीबी (PCB)ग्रुप मध्ये,
तेजश्री तोडकरी 99.40,
तेजश्री गंभीरे 98.80,





**फोटो ओळी - एमएच-सीईटीत ओबीसीतून महाराष्ट्रात पहिला आलेला संगमेश्वर कॉलेजचा मुदय्या स्वामी याच्यासोबत संस्थेचे सचिव धर्मराज काडादी,उपप्राचार्य डी. एम.म्हेत्री, उपप्राचार्य आनंद हुली, प्रा. प्रमोद उडगीकर, सीईटी सेल प्रमुख डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा. सुशांत माळवे, प्रा.शिवराज बगले.**

गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या यशाचे श्रेय आपल्या प्रामाणिक कष्टांना दिले.पालकांच्या आशीर्वादाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने आम्हास हे यश मिळवता आले अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कॉलेजच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात मुद्य्या स्वामी, श्रेया कोळकुर, प्रांजली कुंटे, सोम्या शेख, रिद्धी थरेवाल आणि विश्वनाथ पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

संगमेश्वर कॉलेज नेहमी विद्यार्थ्यांच्या हिताचाच विचार करते विद्यार्थी आणि पालक यांच्या मधील सुसंवाद आणि समन्वय यामुळेच संगमेश्वर कॉलेजचे विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे असे मत उपस्थित संतोष गवळी या पालकांनी व्यक्त केले.

सद्याच्या स्पर्धेच्या युगामध्ये आमच्या कॉलेजचे विद्यार्थी आपली गुणवत्ता सर्वच स्पर्धा परीक्षांमध्ये सिद्ध करत आहेत. याचा आम्हास सार्थ अभिमान आहे . असे मत संस्थेचे सचिव धर्मराज काडादी यांनी व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव धर्मराज काडादी प्राचार्या डॉ.एस. व्ही. राजमान्य, उपप्राचार्य डी. एम.म्हेत्री, उपप्राचार्य आनंद हुली, लॉजिकचे प्रा. सुशांत माळवे, प्रा.शिवराज बगले. विज्ञान शाखा समन्वयक प्रा. प्रमोद उडगीकर, सीईटी सेल प्रमुख डॉ. गणेश मुडेगावकर, प्रा शिवराज पाटील, प्रा. अभिजीत निवर्गीकर, प्रा. सिद्धाराम विजापुरे, प्रा.प्रशांत पाटील प्रा. सौ. एस. आय. शिंदे, प्रा.विशाल जत्ती यांनी अभिनंदन केले. या कौतुक सोहळ्याचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य आनंद हुली यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश मुडेगावकर यांनी केले.तर आभार प्रमोद उडगीकर यांनी मानले.

# कॉलेजची अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन

सोलापूर (दिनांक २ जून ) संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाची अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन झाली आहे.यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ही प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती उपप्राचार्य प्रा. आनंद हुली यांनी दिली.

www.sangameshwarcollege .in या संकेतस्थळावर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी कला वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी कॉलेज संकेतस्थळावरून अर्ज भरावा. . दहावीचा निकाल लागल्यानंतर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार त्यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. महत्त्वाचे म्हणजे ऑनलाइन प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या संकेतस्थळावरील माहिती काळजीपूर्वक वाचून भरणे आवश्यक आहे. कन्नड भाषिक विद्यार्थ्यांसाठी 50 टक्के जागा राखीव आहेत. त्यामुळे प्रवेश अर्जात कन्नड मायनॉरिटी हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे .

सोबत सोबत कन्नड भाषिक प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. दहावी सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी गुणांची नोंद करताना दिलेल्या सूचनांचे पालन करून अर्ज भरावा. ऑनलाइन प्रवेश फॉर्मसाठी नोंदणी शुल्क रुपये पन्नास असून ते डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन भरता येईल. पूर्ण भरलेला अर्ज प्रवेश समितीकडे जमा करताना दहावी गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्जाची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी. विनाअनुदान विभागाच्या प्रवेशासाठी तसेच प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी पर्यवेक्षक प्रा. प्रसाद कुंटे 94223 34499 भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील 94233 26103 यांच्या मोबाईल क्रमां क्रमांकावर संपर्क साधावा.

# संगमेश्वरमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**सोलापूर (प्रतिनिधी )**

इयत्ता बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मित्र मंडळाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व  विभागातील शिक्षकांचा केला. बी १ सभागृहात झालेल्या या समारंभात विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनापासून ते आतापर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांच्या कृतज्ञता व्यक्त केली.त्यानंतर  उपस्थितांचे रोपटे,अनिकेत फताटे यांनी तयार केलेल्या शिक्षकांच्या नावातील गणेश चित्र  देऊन सन्मान करण्यात आले. सत्कारानंतर विद्यार्थी मनोगते झाली.

आपल्या जीवनातील गुरूंमुळेच आम्ही इथपर्यंत चा प्रवास करू शकलो.असं सांगत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्प्यावरील संकटात शिक्षकांनी मार्ग दाखवला.आई  वडिलांच्या नंतर  आमचं जगन शिक्षकांनीही समृद्ध केलं. अश्या संमिश्र भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांनी प्रत्येक व्यक्तिमत्व आपल्यावर कसे प्रभाव टाकते त्यातून काय शिकायला मिळालं हे ऑडिओ व्हिडीओ च्या सादरीकरणातून सांगितले.



सत्काराला उत्तर देताना प्रा. प्रभाकर नागनसुरे यांनी त्यांच्या शालेय जीवनांतील शैक्षणिक वातावरण आणि शिक्षक यांच्या आठवणी सांगितल्या .विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनात आपल्या करिअर साठी परिश्रमाची तयारी ठेऊन अभ्यास साध्य करावा, असे सांगितले. ध्येय आणि उद्दिष्टे ठरली की त्या दिशेने आपण  मार्गस्त होतो .अभ्यासातील सातत्याने आपण जीवनात यशस्वी होतो असेही मान्यवर शिक्षकांनी आपल्या मनोगतात सांगितले. निशा लावते हिने या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर हिने आभार मानले. अनिकेत फताटे,नवनाथ धोत्रे , ऋषिकेश शिवशेट्टी, गीतांजली वळसंगे, विरेश वळसंगे ,मेघा सुरवसे, श्रीहरी काशीद , अस्लम शेख , गणेश कोल्हे  , समर्थ बिराजदार , अतुल कोल्हापुरे , समर्थ तलवार , नैना हिलवाडीकर , मनोज कोठे , समर्थ माशाळे आणि त्यांच्या युवा  मित्रांनी  यांनी परिश्रम घेतले.

# कंपनी सेक्रेटरी क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी
## – सीए अतुल कुलकर्णी

सोलापूर (प्रतिनिधी) 'कंपनी सेक्रेटरी या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत. त्याचा अवश्य लाभ उठवावा. या क्षेत्रात मेहनतीची गरज आहे .नियोजनबद्ध अभ्यास केला योग्य मार्गदर्शन मिळाले तर या विश्वात अनेक ठिकाणी व्यवसाय नोकरीच्या अनेक नामी संधी आहेत . व्यापार,अनेक मल्टिनॅशनल कंपनी उद्योगविश्वातील नामवंत ठिकाणी आपण काम करून नावलौकिक मिळवू शकतो .'असे प्रतिपादन सीए अतुल कुलकर्णी यांनी केलं ते संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजात वाणिज्य विभागाच्या' कंपनी सेक्रेटरी क्षेत्रातील करियर ' या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, " परीक्षापद्धती, अभ्यासक्रमाचे स्वरूप , काळ काम वेगाच नियोजन करता आलं की यश आपोआप मिळते." मंचावर उपप्राचार्य आनंद हुली, प्रा. प्रभाकर नागणसूरे आदी उपस्थित होते .

प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. पाहुण्यांच्या सत्कारानंतर प्रा. मल्लिनाथ साखरे यांचं प्रास्ताविक झालं. सूत्रसंचालन संगीता म्हमाणे यांनी केले. जम्मा यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी प्रा.रवींद्र बिराजदार प्राध्यापकांसह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.



# संगमेश्वरच्या 'प्रतिभासंगम' त्रैमासिकाच्या ई –आवृत्तीचं व भाषा कृतीपुस्तिकांचे प्रकाशन

सोलापूर (दिनांक १४)
संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित विविध संस्थांच्या घडामोडींचा आढावा घेणाऱ्या प्रतिभासंगम या त्रैमासिकाच्या ई –आवृत्तीचे प्रकाशन संस्थेचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य संतोष कोटी, स्तंभलेखक – समीर गायकवाड ,अनुवादक – प्रा. संतोष मडकी, कन्नड लेखक डॉ. बी.बी .पुजारी, संस्कृत अध्यापिका शुभांगी कुलकर्णी या मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमात भाषा संकुलाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड,मराठी या कृतीपुस्तिकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली आदी मंचावर होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपप्राचार्य यांनी या कार्यक्रमाचा हेतू सांगितला. संगमेश्वर मधील नाविन्यपूर्ण उपक्रमांच प्रतिबिंब या प्रतिभासंगम मासिकात उमटणार असल्याचे सांगितले त्यांनी सांगितले . त्यानंतर मान्यवर प्रमुख पाहुण्यांचे सत्कार झाले रोपटे देऊन .







**प्रतिभासंगम या त्रैमासिकाच्या ई –आवृत्तीचे व हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड,मराठी या कृतीपुस्तिकांचे प्रकाशन संस्थेचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य संतोष कोटी, स्तंभलेखक – समीर गायकवाड ,अनुवादक – प्रा. संतोष मडकी, कन्नड लेखक डॉ. बी.बी .पुजारी, संस्कृत अध्यापिका शुभांगी कुलकर्णी, प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य,उपप्राचार्य आनंद हुली या मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.**

प्राचार्य संतोष कोटी यांनी इंग्रजी भाषेच्या स्थित्यंतरातले टप्पे सांगत आपले मनोगत व्यक्त केले. कन्नड साहित्य आणि भाषा यांचे महत्त्व अधोरेखित करत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर भाषेची समृद्धता ही माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते . असे मत डॉक्टर बी. बी . पुजारी यांनी व्यक्त केलं. संस्कृत ही देववाणी असून तिच्यातल्या ज्ञानाचा मानवी जीवन व्यवहारात खूप उपयोग होतो आहे, त्यासाठी भारतीय प्राचीन विज्ञानाकडे पुन्हा एकदा संस्कृतीच्या माध्यमातून पोहोचू शकतो. असं शुभांगी कुलकर्णी यांनी सांगितलं. ब्लॉग लेखक तथा स्तंभलेखक म्हणून लिहिताना अथवा सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होताना उपल मीडियाच्या द्वारे संगमेश्वरचे हे ऐतिहासिक पाऊल 'प्रतिभासंगम' च्या माध्यमातून पडत आहे. असं स्तंभलेखक समीर गायकवाड यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. यातून सामाजिक भान विद्यार्थ्यात निर्माण करता येईल त्याच एक व्यासपीठ म्हणून 'प्रतिभासंगम' व्हावं. कॉलेज विश्वात वावरताना सजगतेने वागलं तरच आपण आपले राहतो.असेही ते म्हणाले.



**प्रतिभासंगम या त्रैमासिकाच्या ई–आवृत्ती प्रकाशन प्रसंगी बोलताना स्तंभलेखक समीर गायकवाड**

आपल्या लेखन विश्वातील अनुभव सांगत त्याने मनोगत व्यक्त केलं.

संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून केजी टू पीजी प्रशिक्षण मिळतच. यातील संस्थांच्या घडामोडींचा, संशोधनपर कृती सत्र, व्याख्याने, विद्यार्थीकेंद्री उपक्रम, शैक्षणिक लेख या प्रतिभासंगम मधून येतील असं सांगत धर्मराज काडादी यांनी आपलं मनोगत व्यक्त केले. इंग्रजी कम्युनिकेशन वरील पुस्तकाचा लेखन–प्रपंच डॉ.गणेश मुंडेगावकर आणि कोमल कोंडा यांनी सांभाळला होता त्यांचाही सत्कार या कार्यक्रमात झाला. पु. ल . देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित सोनी मराठी वाहिनी आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टँड अप कॉमेडी स्पर्धेतील विजेत्या जैद शेख आणि कुणाल बाबरे यांचाही सत्कार याच कार्यक्रमात करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य यांनी कॉलेजच्या या नव्याने सुरू होणाऱ्या उपक्रमाचं वैशिष्ट्य सांगत. आपलं मनोगत व्यक्त केलं. सूत्रसंचालन डॉ. गणेश मुडेगावकर यांनी केले तर आभार प्रा. शुभांगी गावंडे यांनी मानले.

# चार्टर्ड अकाउंटन्सी  क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी
## सीए- नीलाशा नोगजा





सोलापूर (प्रतिनिधी) 'चार्टर्ड अकाउंटंट या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत त्याचा लाभ घेताना या क्षेत्रात प्रचंड मेहनतीची गरज आहे .नियोजनबद्ध अभ्यास केला योग्य मार्गदर्शन मिळाले तर या  विश्वात अनेक नामी संधी आहेत . उद्योगविश्वातील नामवंत ठिकाणी आपण काम करून नावलौकिक मिळवू शकतो .'असे प्रतिपादन सीए नीलाशा नोगजा यांनी केलं त्या संगमेश्वर ज्युनिअर कॉलेजात वाणिज्य विभागाच्या
' सीए क्षेत्रातील करियर '  या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या.याच कार्यक्रमात सीए सुप्रिया औसेकर यांनी परीक्षापद्धती, अभ्यासक्रमाचे स्वरूप , काळ काम वेगाच नियोजन कसं करावं. स्वयं अध्ययन करून विद्यार्थी या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करू शकतो. याविषयी सविस्तर मार्गदर्शन केलं. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य आनंद हुली, प्रा. प्रभाकर नागणसूरे , प्रा. बसय्या हणमगाव आदी उपस्थित होते . प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. पाहुण्यांच्या सत्कारानंतर प्रा.रूपाली पाटील यांनी त्यांची ओळख करून दिली.प्रा. संगीता म्हमाणे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अमृता शेळके हिने केले तर प्रा.रवींद्र बिराजदार यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी मल्लिनाथ साखरे, बाबासाहेब सगर, मंजुळा बीड, अनिता अलकुंटे या प्राध्यापकांसह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.






# विद्यापीठ स्तरावर संगमेश्वर अव्वल ठरल्याने कॉलेजमध्ये क्रीडा जल्लोष

## वार्षिकांक स्पर्धेत प्रज्ञा अंक सर्वप्रथम

सोलापूर ( प्रतिनिधी) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही क्रीडाक्षेत्रात पूर्ण दाखवणाऱ्या महाविद्यालयांचा सत्कार करण्यात आला.यंदाच्या वर्षी डॉ. पुरणचंद पुंजाल चषकाचा मानकरी ठरलेल्या संगमेश्वर कॉलेजच्या संघासह हा सर्वसाधारण महाविद्यालयाचा पुरस्कार संगमेश्वर कॉलेजला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी तथा राष्ट्रीय धावपटू भाग्यश्री बिले , कुलगुरू मृणालिनी फडणवीस ,डॉ. वसंत कोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत चषका सह कॉलेजमधून क्रीडापटूंच्या सोबत विजयी जल्लोष यात्रा काढण्यात आली. मैदानात जमलेल्या कॉलेजच्या तरुणाईला सर्वप्रथम शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापकविद्यापीठात झालेल्या क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात 'प्रज्ञा ' वार्षिकांकास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. हा पुरस्कार कॉलेजच्या वतीने डॉ. सुहास पुजारी आणि प्राचार्य यांनी स्वीकारला यानिमित्ताने कॉलेजच्या प्रांगणामध्ये क्रीडा जल्लोष या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. प्रारंभी आनंद चव्हाण यांनी संबोधित केलं , या यशात संगमेश्वर कॉलेजच्या खेळाडूंच मोलाचे योगदान असल्याचे नमूद करत याचं सारं श्रेय कॉलेजच्या क्रीडापटूंना दिलं . व्यवस्थापनाने दाखवलेला विश्वास सहकाऱ्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमाच्या बळावर कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद मिळाले असंही त्यांनी सांगितलं.









त्यानंतर संपादक या नात्याने प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी प्रज्ञा वार्षिकांकात ज्या मान्यवरांनी लेख लिहिले आणि हा अंक परिपूर्ण होण्यासाठी ज्या ज्ञात-अज्ञात आणि सहकार्य केलं त्या सर्वांचे आभार मानले. यापुढेही ही अशीच घोडदौड चालू राहण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे. असं सांगत प्रज्ञा अंक कॉलेजचा प्रतिभेचा कॉलेजच्या प्रतिभेचा दर्शन घडवणारा अंक आहे यासाठी ज्या कॉलेजच्या ज्या घटकांनी सहकार्य केले त्या सर्वांचे संपादकीय मंडळ ऋणी आहे.

याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य , उपप्राचार्य आनंद हुली रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय आवटे, कला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील , उपप्राचार्य धानप्पा मैत्री डॉ. वंदना पुरोहित , डॉक्टर राजकुमार मोहरकर यांच्यासह क्रीडापटू आणि आणि कॉलेजची तरूणाई उपस्थित होती.

# संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये बालगोपाळांसाठी आषाढी वारीनिमित्त बाल दिंडीचे आयोजन

सोलापूर (दि 10 )बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकाराम महाराज की जय ...विठ्ठल विठ्ठल ...जय हरी विठ्ठल... च्या नामघोषात बाळगोपाळांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारी काढली. यात संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील बालगोपाळ सहभागी झाले होते. कोणी बाल वारकरी झाले होते. कोणी झेंडेधारी. कुणी पालखीचे सेवक. जनाई – मुक्ताई च्या वेशात जणू संतभारच शाळेच्या मैदानावर अवतरला होता. वारकऱ्यांच्या वेशातील मुले रंगीबेरंगी कपड्यात उठून दिसत होती. विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशातील मुलांनी साक्षात विठूमाऊलीच्या रूपात सर्वांना दर्शन दिलं. संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. याचे आयोजन पब्लिक स्कूलच्या वतीने करण्यात आलं होतं. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पालखीच पूजन झालं पूजेनंतर विविध अभंगावर विद्यार्थ्यांनी नृत्य केले. अभंग सादरीकरणानंतर हे दिंडी शाळेच्या परिसरातील वसाहतीमध्ये मार्गस्थ झाली. याप्रसंगी प्राचार्य गायत्री कुलकर्णी , उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी, शोभा गोटे प्रशांत बिराजदार यांच्यासह शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.





# रक्तदान हे सामाजिक उत्तरदायित्व कार्य



विनम्र अभिवादन ...






## संगमेश्वर मध्ये कर्मयोगी अप्पासाहेबांच्या ११० व्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात १११ जणांचे रक्तदान

सोलापूर प्रतिनिधी आजच्या आधुनिक काळात आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहेत. त्यामध्ये रक्ताची गरज महत्वाची असते .रक्तदान केल्याने ही गरज पूर्ण होऊ शकते. एखाद्या व्यक्तीचे आयुष्य आपण वाचवू शकतो. वास्तविक रक्तदान ही चळवळ आहे. त्यातून सामाजिक कार्य घडून येतं. रक्तदान हे एक सामाजिक उत्तरदायित्वच आहे. असे विचार छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालययाचे समुपदेशक योगेश कांबळे मांडले. ते संगमेश्वर कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित केलेल्या कर्मयोगी कै. आप्पासाहेब काडादी यांच्या 110 व्या जयंतीदिनी रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या रक्तदान शिबिरात छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, दमाणी ब्लड बँक यांनी रक्त संकलनाचे केलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य होत्या . शिबिराचे उद्घाटन डॉक्टर सुशील सोनवणे यांच्या हस्ते झाले. दमाणी रक्तपेढीच्या सौ बनसोडे , कुलकर्णी, रात्र महाविद्यलयाचे प्राचार्य संजय आवटे, उप प्राचार्य आनंद हुली, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सुनील सोनटक्के, डॉ. विजय मुलीमनी याप्रसंगी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रियांका हालकटी हिने केले . श्रेया माशाळ हिने सूत्रसंचालन केले तर ऐश्वर्या कांबळे हिने आभार मानले. रक्तदान शिबिराचे नियोजन प्रा. ए. व्ही. साखरे प्रा. एम. एस. कावळे प्रा. एस. एम. मेटकरी केलं,तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अनमोल परिश्रम घेतले.

# संगमेश्वर महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उदघाटन

## अभ्यासाशिवाय कोणतेच यश मिळवू शकत नाही – रोमान

सोलापूर प्रतिनिधी
'क्षेत्र कोणतेही असो, प्रत्येक क्षेत्रात अभ्यास हा खूप महत्त्वाचा भाग असतो. संगीत, साहित्य, क्रीडा यांसह इतर सर्वच क्षेत्रात अभ्यास करावाच लागतो , अभ्यास केल्याशिवाय कोणतेच यश आपण मिळवू शकत नाही. "असे प्रतिपादन प्रसिद्ध संगीतकार रोमान यांनी केले.



संगमेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी साहित्य मंडळाचे उदघाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळेस त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या गिटार वादनाने आणि गाण्याने मंत्रमु करत त्यांच्या यशामागील शिक्षकांची भूमिका सांगत शिक्षकांसोबत राहण्याचा सल्ला दिला.. यावेळी साहित्य मंडळाचे अध्यक्ष इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. धानप्पा मेत्री, प्रा. अर्जुन धोत्रे, डॉ. नंदा साठे, डॉ उषा जमादार, प्रा महमद मुस्तफा मकानदार, प्रा रेवण हल्लोळी, प्रा नागेश खराडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना नवले यांनी केले तर आभार महासिद्ध कोटगोंडे यांनी मानले..

# शैक्षणिक नववर्षात शाळेच्या पहिल्या दिवशी संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उस्फुर्त स्वागत

सोलापूर (दिनांक 17) वेळ सकाळी 8 ची संगमेश्वर पब्लिक स्कूलचे प्रांगण विद्यार्थ्यांच्या गर्दीने फुलून गेले होते. शाळेने विद्यार्थ्यांचे स्वागत मोठ्या उत्साही वातावरणात केलं गेलं . गुलाब पाकळ्यांच्या माध्यमातून मुलांचं आकर्षक सजावटीतुन सर्वांचे लक्ष वेधून घेत नवागतांचे स्वागत करण्यात आले. प्रत्येक जण आपल्या पाल्यास सोबत सेल्फी काढण्यात दंग होता कारण होतं शाळेचा पहिला दिवस. विद्यार्थी पालकांचा हा दिवस अविस्मरणीय होणार होता. या कार्यक्रमासाठी शाळेने छान तयारी केली होती. प्रारंभी राष्ट्रगीत आणि सरस्वती स्तवन झालं. आणि प्राचार्यांचे मनोगत झालं. मनोगतामध्ये प्राचार्यांनी मुलांचे स्वागत करत येत्या शैक्षणिक वर्षात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. सोबतच आनंददायी शिक्षण कसं होईल यासाठी पालकांचा सहभाग किती महत्वाचा आहे , शाळेची जबाबदारी याबद्दल सविस्तर विवेचन केलं. पालक प्रतिनिधी गवडनवरू यांनी वार्षिक प्रगतीचा अहवाल सांगितला. उपस्थित पालकांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी ज्या विद्यार्थ्यांचे वाढदिवस होते अशा स्वरूपात अवताडे आणि अब्दुल रहमान यांना भेट कार्ड देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांवर गुलाबपुष्पवृष्टी करून मुलांचा शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्यात आला. याप्रसंगी संगमेश्वर पब्लिक स्कूल मधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक आदी उत्साहाने उपस्थित होते.





पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर च्या वतीने उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार 2019 साठी संगमेश्वर महाविद्यालयाची निवड झाली.

1 ऑगस्ट विद्यापीठाच्या वर्धापन दिनी हा पुरस्कार महाविद्यालयाला प्रदान केला गेला मान्यवरांच्या शुभहस्ते. महाविद्यालयाच्या उज्ज्वल शैक्षणिक प्रवासात ज्या ज्ञात- अज्ञातांचा सहभाग आहे आणि राहील त्या सर्वांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने

**मनःपूर्वक आभार.**

